**गुरुराज नं २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**

**(गंधर्वनगरी)**

**३०/अ, ४अ, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८.**

नोंदणी क्रमांक : एच एस जी (टी सी) / १०१ / १९९२-९३ दिनांक ४ जून १९९२.

**जावक क्रमांक : MC/2022/04/SGM/Notice/02**

**दिनांक :** १५ . ०४ . २०२२

---

**विशेष सर्वसाधारण सभेसाठी खालील सूचना**

**(फक्त सभासदांसाठी)**

आपल्या उपरोक्त २०२२ वर्षातील संस्थेची पहिली **विशेष सर्वसाधारण सभा स्वस्तिक सभागृह** - पत्ता दुकान क्रमांक २०१, ब्लॉक - बी १, HDFC बँकेच्या वर, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र ४११०३८ वर रविवार दिनांक १७ एप्रिल २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. तरी सर्व सभासद बंधुभगिनींनी कृपया या सभेस आवर्जून उपस्थित राहावे व कामकाजात सहभाग घ्यावा ही विनंती.

**विशेष सूचना**

१. सर्व सभासदांना वेळेवर उपस्थित राहण्याची नम्र विनंती. जेणेकरून सभेचे कामकाज वेळेवर सुरू होईल व आपल्या संस्थेतील जेष्ठ सभासदांना गैरसोय होणार नाही. याची सर्वांनी काळजी घ्यावी.
२. सभेची वेळ दुपारची असल्याकारणाने व्यवस्थापकीय समितीने विशेष सर्वसाधारण सभेसाठी अल्पोपहार (मिनी लंच - Mini Lunch) ची सर्व सभासदांसाठी सोय केलेली आहे.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ मार्च २०१९ -असाधारण भाग आठ - असाधारण क्रमांक २१ महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनिमय आणि विधी

व न्याय विभागाकडून आलेली विधेयका नुसार. (In persuasions of clause 3 of article 348 of the constitution of India the following translation in English of Maharashtra cooperative societies amendment Ordinance 2019 Mah. Ord. IX of 2019 is published under the authority of Governor.)

कायद्यातील झालेल्या बदलानुसार २०१९ पासून सह-सभासद व सहयोगी सभासद यांनादेखील जनरल बॉडी मिटिंग मध्ये / सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार कायद्याने बहाल केलेला आहे त्यानुसार आपल्या सोसायटीच्या येणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी सह सभासद व सहयोगी सभासद यांना सामील करून घेता येणार आहे. (प्रथम सदस्याची लेखी शिफारस / लेखी पूर्व संमती पत्र अनिवार्य असेल) (प्रथम सभासद / सहसभासद / सहयोगी कोणती ही एकच व्यक्ती विशेष सर्वसाधारण सभेत भाग घेऊ शकेल)

दिनांक १४. ०४. २०२२ झालेल्या व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीत हा मुद्दा मांडून जे सभासद बाहेरगावी आहेत किंवा आरोग्य मुळे सभेत सहभागी होऊ शकत नाहीत ते त्यांच्या सहसभासदास किंवा सहयोगी सभासदास सभेसाठी भाग घेण्यास नियुक्त करू शकतात (कायद्या प्रमाणे). तरी सर्व सहसभासद व सहयोगी सभासदांची नावे सोसायटीला लेखी पूर्व संमती पत्र देऊन विशेष सर्वसाधारण सभेत कामकाजात भाग घेण्यास प्राथमिक सभासद नियुक्त करू शकतात.

(For Reference We have attached the Copy of the Ordinance / अध्यादेश पत्र सोबत जोडले आहे)

४. जे सभासद परदेशी किंवा बाहेरगावी असतील, त्यांना १७. ०४. २०२२ च्या विशेष सर्वसाधारण सभेत आपण झूम मीटिंग (व्हर्च्युअल प्लॅटफॉर्म ) ची

सोय करणार आहोत.  हा ठराव १४. ०४. २०२२ या व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीत ६ विरुद्ध १ मताने पारित झाला असल्याने झूम वर्च्युअल मीटिंग (व्हर्च्युअल  प्लॅटफॉर्म ) चे नियोजन केले जाईल.
झूम मीटिंग ही परदेशी आणि बाहेर गावी असणाऱ्या सभासदांना सहभागी करण्यासाठी व त्यांच्या सोयीसाठी घेतलेले व्यवस्थापकीय समितीचे पाऊल आहे. जेणेकरून कोणतेही सभासद पुनर्विकास प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यापासून वंचित राहणार नाहीत.
झूम मिटिंग वर उपस्थित राहणाऱ्या सदस्यांनी त्यांचे मतदान सभेच्या / ठरावाच्या शेवटी कॅमेरा ऑन करून घेण्यात येईल आणि मीटिंग नंतर ई-मेल द्वारे किंवा कागदावरील स्कॅन कॉपी द्वारे ठरावास त्यांची मान्यता लेखी स्वरुपात कळविण्यात यावी ही विनंती. (झूम मीटिंग रेकॉर्ड केली जाईल)

| | | |
|---|---|---|
| **(समीर पुणेकर)** | **(वैभव देशपांडे)** | **(विक्रमसिंह देसाई)** |
| **सचिव** | **खजिनदार** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापकीय समिती** | **व्यवस्थापकीय समिती** | **व्यवस्थापकीय समिती** |